**ठळक बातम्या**

- एआय इम्पॅक्ट समिट कृत्रिम बुद्धिमत्तेचा जगभरात उपयोग करण्याच्या दिशेने महत्त्वाचं वळण ठरल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत वॉशिंग्टन इथं होणाऱ्या वाटाघाटींचं वेळापत्रक पुन्हा आखण्याचा दोन्ही देशांचा निर्णय

- अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही परदेशी वस्तूंवरच्या आयातशुल्कात वाढ करून ते १५ टक्क्यांवर नेण्याची डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

**आणि**

- पाकिस्तानने अफगाणिस्तानवर आणि इस्रायलने लेबननवर केलेल्या हल्ल्यात एकूण २९ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं नुकतीच पार पडलेली इंडिया एआय इम्पॅक्ट समिट अर्थात जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभाव शिखर परिषद ही आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग जगभरात कसा केला जाईल, या दिशेनं एक महत्त्वाचं वळण ठरल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १३१ वा भाग होता. या परिषदेत अमूलच्या बूथवरचं प्राण्यांवर उपचार आणि देखरेखीसाठीचं कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपकरण तसंच आपले प्राचीन ग्रंथ, प्राचीन ज्ञान, आपली हस्तलिखितांच्या जतनासंदर्भातलं ॲप्लिकेशन, या भारताच्या दोन उत्पादनांनी जगभरातील नेत्यांना प्रभावित केल्याचं त्यांनी सांगितलं. या शिखर परिषदेत संपूर्ण जगाला भारताची कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील अद्भुत क्षमता

पाहायला मिळाली असं ते म्हणाले.

## MKB MODI AI SUMIMT

या शिखर परिषदेत तरुणांचा उत्साहवर्धक सहभाग पाहायला मिळाल्याचं ते म्हणाले.

आज देश गुलामीच्या प्रतीकांना मागे टाकून भारतीय संस्कृतीशी संबंधित असलेल्या गोष्टींना महत्त्व देऊ लागला आहे. याच दिशेचं पुढचं पाऊल म्हणून उद्या २३ फेब्रुवारीला राष्ट्रपती भवनात राजाजी उत्सवा दरम्यान सी. राजगोपालाचारी यांच्या प्रतिमेचं अनावरण होईल अशी माहिती त्यांनी दिली. ब्रिटीश वास्तुविशारद एडविन यांच्या प्रतिमेऐवजी राजाजींची प्रतिमा तिथे लावली जाईल असं त्यांनी सांगितलं.

खेळ आपल्याला परस्परांशी जोडतात असं त्यांनी सांगितलं. सध्या सुरू असलेल्या टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेचा उल्लेख त्यांनी केला. या स्पर्धेत अनेक देशांच्या संघात मूळ भारतीय वंशाचे खेळाडू असल्याचा संदर्भ त्यांनी दिला. भारतीय कुठेही गेले तरी आपल्या मातृभूमीशी जोडलेले राहतात आणि आपली कर्मभूमी म्हणजे ज्या देशात ते राहतात त्या देशाच्या विकासातही हातभार लावतात असं ते म्हणाले.

देशात अवयवदानाविषयीची जागरूकता सातत्यानं वाढत असल्याचं त्यांनी नमूत केलं. याच संदर्भाने अलीकडेच केरळमध्ये अवघ्या दहा महिन्यांच्या आलिन हिचा मृत्यू झाल्यानंतर तिच्या पालकांनी आलिनच्या अवयवदानाचा निर्णय घेतल्याची घटना त्यांनी श्रोत्यांना सांगितली. अवयवदानामुळे गरजूंना नवं आयुष्य मिळाल्याची देशभरातली अनेक उदाहरणं त्यांनी आज श्रोत्यांसमोर मांडली.

ऑनलाईन फसवणुकीबद्दलही त्यांनी संवाद साधला. डिजिटल अरेस्ट विषयी देशात जागरूकता वाढली असली तरी आजही अशी प्रकरणं घडत असल्याच्या

पार्श्वभूमीवर याबाबतीत सगळ्यांनी सतर्क राहण्याचं आवाहन त्यांनी केलं. आपला ओटीपी कोणासोबतही सामायिक न करणं, सतत पासवर्ड बदलणं आणि अधिकृत ॲपचा वापर करणं असे सल्ले त्यांनी दिले. बँकांद्वारे ग्राहकांच्याच सुरक्षेसाठी केवायसी अर्थात ग्राहकांच्या तपशीलाची पुनर्पडताळणी होत असते, त्यामुळे अशा प्रक्रियेबद्दल चीड न बाळगता सहकार्य करण्याचं आवाहन त्यांनी केलं. यादृष्टीनंच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वतीनं पार पडलेल्या आर्थिक साक्षरता सप्ताहाची माहितीही त्यांनी दिली.

आपले शेतकरी केवळ अन्नदाता नाहीत, तर ते आपल्या भूमीचे खरे साधक आहेत असं प्रधानमंत्री म्हणाले. देशातला शेतकरी पारंपरिक पद्धत आणि तंत्रज्ञानाच्या सोबतीनं वाटचाल करतो आहे, असं त्यांनी सांगितलं. याबाबतीतल्या यशस्वी प्रयोगांची उदाहरणंही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. आपले शेतकरी केवळ उत्पादनावरच नाही, तर गुणवत्ता, मूल्यवर्धन आणि नव्या बाजारांवरही लक्ष देत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. आता तर कृषी उत्पादनं हवाई मार्गानंही अगदी सहज परदेशात पोहोचत असल्याचं ते म्हणाले.

आगामी रमझान आणि होळीच्या सणात व्होकल फॉर लोकलचा मंत्र जपावा आणि देशाला आत्मनिर्भर बनवण्यात हातभार लावावा, असं आवाहन त्यांनी केलं. येत्या २४ फेब्रुवारीला तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री दिवंगत जयललिता यांची जयंती असल्याचं स्मरण करत त्यांनी आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी  आज उत्तर प्रदेशात नमो भारत ट्रेन आणि मीरत मेट्रो सेवेचं उद्घाटन करणार आहेत. शताब्दी नगर रेल्वे स्थानकावरून ते मीरत मेट्रो आणि नमो भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील. प्रधानमंत्री मोदी आणि उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ मेट्रोमधून प्रवास करणार आहेत.

त्यानंतर प्रधानमंत्री मोहिद्दीनपूर इथं विविध विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. तसंच जनसभेला संबोधित करतील.

**<><><><><>**

उप राष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज तमिळनाडू दौऱ्यावर जाणार आहेत. मदुराई इथं व्ही ओ चिदंबरम पिल्लई यांच्या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यात ते सहभागी होणार आहेत. त्यानंतर ते राणी वेलु नचियार राजवाडा आणि तिरुकोश्टियुर सोम्या नारायणा मंदिराला भेट देतील.

**<><><><><>**

भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत वॉशिंग्टन इथं होणाऱ्या वाटाघाटींचं वेळापत्रक पुन्हा आखण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतला आहे. दोन्ही देशांमधल्या व्यापार कराराला अंतिम रूप देण्यासाठी उद्यापासून ही बैठक सुरु होणार होती. भारतीय शिष्टमंडळ या तीन दिवसीय बैठकीची सुरुवात करणार होतं. व्यापार करारासाठीच्या वाटाघाटींमध्ये भारतातर्फे वाणिज्य मंत्रालयातले सहसचिव दर्पण जैन प्रमुख भूमिका बजावणार आहेत.

अमेरिकेच्या व्यापार धोरणावरून नुकत्याच झालेल्या घडामोडी आणि त्याचे परिणाम, याचं दोन्ही बाजू मूल्यांकन करतील, आणि त्यानंतर भारतीय पथकाची अमेरिका भेट निश्चित केली जाईल, असं वाणिज्य मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं ट्रम्प यांनी जगभरातल्या देशांवर लादलेलं शुल्क असंवैधानिक असल्याचा निर्णय दिल्यानंतरही ट्रम्प यांनी परदेशी वस्तूंवरच्या आयातशुल्कात वाढ करून ते १० टक्क्यांवरून १५ टक्क्यांवर नेलं आहे. अमेरिकेचा 'आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायदा', राष्ट्राध्यक्षांना आयातीवर व्यापक, सर्वसमावेशक शुल्क लागू करण्याचा अधिकार

देत नसल्याचा निर्णय न्यायालयानं दिला होता. या निकालामुळे अब्जावधी डॉलर्सच्या दाव्यांची परतफेड होण्याचा मार्ग खुला होईल. मात्र, निकालांनंतर काही तासांतच, ट्रम्प यांनी नव्या शुल्क आकारणीची घोषणा केली.

न्यायालयाच्या या निर्णयामुळे अमेरिकेच्या व्यापार धोरणाला आकार देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना गती मिळणार नसल्याचा युक्तिवाद ट्रम्प यांनी यावेळी केला. राष्ट्रीय सुरक्षा आणि व्यापाराशी संबंधित आयातशुल्क कोणत्याही व्यत्ययाशिवाय लागू राहील, असं त्यांनी यावेळी सांगितलं. त्यामुळे ट्रम्प यांचं व्यापार धोरण अडचणीत असूनही, पुढे नेलं जाईल अशी शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प येत्या २४ फेब्रुवारीला अमेरिकी काँग्रेसच्या संयुक्त सत्राला संबोधित करतील. त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळातलं हे पहिलं 'स्टेट ऑफ द युनियन' भाषण असेल.

**<><><><><>**

पाकिस्तानने आज अफगाणिस्तानावर केलेल्या हवाई हल्ल्यात सतरा जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. पाकिस्तानने काल रात्री अफगाणिस्तानच्या नंगरहार आणि पक्तिका प्रांतात नागरी वस्तीवर हवाई हल्ले केले, यात अनेक नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहिती अफगाणिस्तान सरकारचे प्रवक्ता  जबिहुल्लाह मुजाहिद यांनी माध्यमांना दिली. पाकिस्तानने हा हल्ला केल्याचं मान्य केलं आहे, मात्र पाकिस्तानने अफगाणिस्तानाततल्या दहशतवादी तळांवर तसंच पाकिस्तानी तालिबान्यांच्या ठिकाणांवर हल्ले केल्याचं पाकिस्ताननं म्हटलं आहे.

**<><><><><>**

इस्त्रायलने लेबननवर केलेल्या हल्ल्यात दहा जणांचा मृत्यू झाल्याचं लेबनन सरकारने म्हटलं आहे. बालबेक परिसरातल्या हिजबोला संघटनेच्या तीन तळांवर

हल्ला केल्याचं इस्त्रायल संरक्षण दलाने मान्य केलं आहे. या ठिकाणांवरून इस्त्रायलवर हल्ला करण्याची योजना आखली जात होती असा आरोप इस्त्रायलने केला आहे. याशिवाय इस्त्रायलने लेबननमधल्याच हमासच्या तळावर केलेल्या हल्ल्यात दोन जणांचा मृत्यू झाला आहे.

**<><><><><>**

नासानं येत्या मार्च मधली आपली प्रस्तावित मानवयुक्त चांद्र मोहीम तांत्रिक कारणामुळे पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. नासाचे प्रमुख जेरेड आयझॅकमन यांनी आज ही घोषणा केली. आर्टेमिस २ मोहिमे अंतर्गत तीन अमेरिकन आणि एक कॅनेडियन अंतराळवीर चंद्राच्या कक्षेत फिरतील. सुमारे १० दिवस ही मोहीम चालेल. मानवाला चंद्राच्या पृष्ठभागावर पुन्हा पाठवण्याच्या दिशेनं हे अभियान महत्वाचं समजलं जात आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं झालेल्या बाल लैंगिक शोषण प्रकरणी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती याच्या विरोधातल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी विशेष पॉक्सो न्यायालयानं एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी आशुतोष ब्रह्मचारी महाराज आणि इतर याचिकाकर्त्यांनी अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये अविमुक्तेश्वरानंद याच्या विरोधात एफ.आय.आर. नोंदवण्याचे निर्देश देण्याची मागणी केली होती.

संबंधित पुरावे तपासल्यावर आणि पीडित मुलांचे जबाब नोंदवल्यानंतर विशेष न्यायाधीश विनोद कुमार चौरसिया यांच्या न्यायालयानं गेल्या आठवड्यात आपला निर्णय राखून ठेवला होता. त्यावर न्यायालयानं हा निर्णय दिला असून पोलीस चौकशीचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

विशेष सखोल पुर्नरिक्षणामुळे ९ राज्यातल्या आणि केंद्रशासीत प्रदेशांमधल्या मतदारांमध्ये १ पूर्णांक ७० शंताश टक्के घट झाली आहे. प्रकाशित मतदार याद्यांच्या आकडेवारीवरुन हे स्पष्ट झालं आहे. यामध्ये गुजरात, पुद्दूचेरी, लक्षद्वीप, राजस्थान, छत्तीसगड, अंदमान आणि निकोबार बेटं, गोवा आणि केरळच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या आकडेवारीचा समावेश आहे.

**//<><><><><>//**